# पुणे विद्यापीठ
## गणेशखिंड, पुणे–४११००७

संदर्भ:– एक्स टी/एम..कॉम./५१५७ दिनांक:– १८/११/२०११

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संबधित संलग्न वाणिज्य महाविद्यालये,

**विषय:–** डिसेंबर २०११ मध्ये होणा–या एम.कॉम. सत्र १ ते ४ (२००८ पॅटर्न),एम.सी.ए (कॉमर्स ) एम. कॉम. (ई –. कॉमर्स) परीक्षेची नेमलिस्ट, परीक्षाप्रवेशपत्र, समरी बाबत......

महोदय/महोदय,

डिसेंबर २०११ मध्ये होणा–या एम.कॉम. सत्र १ ते ४ (२००८ पॅटर्न)/एम.सी.ए ;कॉमर्स एम. कॉम. (ई –. कॉमर्स) वाणिज्य परीक्षेसाठी आपल्या महाविद्यायालयामार्फत जे विद्यार्थी बसलेले आहेत त्या विद्यार्थ्यांच्या नावांची यादी, परीक्षा प्रवेश पत्रे व समरी व सत्रांत परीक्षेच्या गुणांची सी.डी. पाठविण्याची खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे. प्रवेश पत्रे, विद्यार्थ्यांची विषयावार माहिती बरोबर असल्याची कृपया खात्री करून घ्यावी.

१.नाशिक जिल्हयातील सर्व महाविद्यालयांचे वरील साहित्य विद्यापीठाच्या नाशिक येथील उपकेंद्रावर पाठवित आहोत.(विद्यापीठ विभागीय कार्यालय, नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयासमोर एच.डी.एफ. सी.हाऊस जवळ, महानगरपालिका मार्केट इमारत, तिसरा मजला नाशिक–२) आपल्या महाविद्यालयाचा प्रतिनिधी शनिवार दि. १९/११/२०११ रोजी दुपारी १.०० ते ४.०० या वेळेत पाठवून सदरचे साहित्य या उपकेंद्रावरून घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

२. अहमदनगर जिल्हयातील सर्व महाविद्यालयांचे वरील .साहित्य विद्यापीठाच्या अहमदनगर येथील उपकेंद्रावर पाठवीत आहोत. (विद्यापीठ विभागीय कार्यालय, न्यू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर) आपल्या महाविद्यालयाचा प्रतिनिधी शनिवार दि.१९/११/२०११ रोजी दुपारी १.०० ते ४.०० या वेळेत पाठवून सदरचे साहित्य या उपकेंद्रावरून घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

३. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील सर्व महाविद्यालयांनी वरील साहित्य विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या बी.कॉम. कक्षातून सोमवार दि. २१/११/२०११ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० या वेळेत महाविद्यालयाचा प्रतिनिधी पाठवून सदरचे साहित्य घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला विश्वासू,
18/11/2011
उपकुलसचिव
(परीक्षा)

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी:–

१. केंद्र प्रमुख, विद्यापीठ उपकेंद्रे, नाशिक व अहमदगनर.
सदरचे साहित्य संबंधित महाविद्यालयांना वेळेत उपलब्ध करून द्यावे.

२. मा. गृहव्यवस्थापक (गृहव्यवस्थापन विभाग)
प्रत्येक उपकेंद्रासाठी शनिवार दि. १९/११/२०११ रोजी सकाळी ७.०० वा. दोन स्वतंत्र वाहने उपलब्ध करण्याची व्यवस्था करावी.

marathi.m.com.summary.1